# संपादकीय

८ मार्च, आंतरराष्ट्रीय महिला दिन अगदी नजिक आला आहे. तसा जगामध्ये कित्येक दशके हा दिन पाळला जात आहे. परंतु आपल्याकडे मात्र अलिकडच्या काही वर्षांतच त्याला महत्त्व प्राप्त झाले आहे. महाराष्ट्रातही ठिकठिकाणी ८ मार्च पाळला जातो. त्यासाठी स्त्रियांच्या मागण्यावर मोर्चे, धरणे, सभा प्रदर्शने अथवा अन्य कार्यक्रम आखले जातात. स्त्रियांना आपल्यावरील अन्यायाची जाणीव होत आहे, आपल्या हक्काचे भान येत आहे, संघटित लढयाचे महत्व पटत आहे ह्याचेच ते द्योतक आहे. जसजसे स्त्रियांवरील अन्याय अत्याचार वाढत आहेत, स्त्रियांचे प्रश्न बिकट होत चालले आहेत तसतसा स्त्रीमुक्ती चळवळीलाही जोर चढत आहे. निरनिराळया प्रश्नावर स्त्रियांचे संघटित लढे उभारले जात आहेत.

स्त्रीमुक्ती आंदोलन संपर्क समितीच्या नुकत्याच पुण्यात झालेल्या चर्चा सत्रामध्ये खेडयापाडयातून व शहरात झोपडपट्टयातून पिण्यांच्या पाण्याची सोय, पाळणाघरे आणि जागतिक शांतता या मागण्या घेऊन यंदाचा ८ मार्च पाळण्याचे ठरविण्यात आले. स्वातंत्र्य मिळून ३४ वर्षे झाली तरी अजून खेडयापाडयातून पिण्याचे पाणी नळाने घरापर्यंत आपले शासन पोचवू शकले नाही ह्याचा जाच प्रामुख्याने स्त्रियांनाच होतो कारण स्त्रियांनाच पिण्याचे पाणी भरण्यासाठी दूरवर जावे लागते. एवढे करूनही अपुरे, गढूळ आणि अशुद्ध पाणीच त्यांच्या वाटयाला येते. शहरात झोपडपट्टयांमधूनही पुरेशा पाण्याच्या सोयीअभावी तेथील लोकांचे जीवन त्रस्त झाले आहे. मानवी जीवनासाठी किमान आवश्यक असलेली ही पाण्याची गरज भागविण्यातही स्वतंत्र भारताचे शासन यशस्वी झालेले नाही ही खरोखर खेदाची बाब आहे. म्हणून ग्रामीण व कष्टकरी स्त्रियांच्या दृष्टीने पिण्याच्या पाण्याची मागणी महत्त्वाची ठरते. महागाईमुळे आज स्त्रियांना रोजगार मिळवणे आवश्यक ठरत आहे. शहरात आणि खेडयापाडयातील अनेक स्त्रिया कामधंद्यासाठी घराबाहेर पडतात. पाळणाघरांअभावी तान्ही मुले संभाळण्यासाठी लहान मुलींना घरी ठेवावे लागत असल्यामुळे ग्रामीण व कष्टकरी वर्गातील मुलींचे शिक्षण मागे पडते. नोकरी व्यवसायासाठी घरापासून दूर जावे लागणाऱ्या पांढरपेशा, मध्यमवर्गीय स्त्रियांनाही बालसंगोपनाचा प्रश्न भेडसावतो. म्हणून कामाच्या ठिकाणी आणि वस्त्यांमध्ये शासनाने पाळणाघरे सुरु करण्यासाठी स्त्रीसंघटनांना आवश्यक त्या सोयीसवलती आणि वित्तपुरवठा उपलब्ध करून दिला पाहिजे अशी दुसरी मागणी केली आहे. निरनिराळया देशांमधील वाढती शस्त्रास्त्र स्पर्धा आणि युद्धे यामुळे एकूण मानवी जीवनच धोकाग्रस्त आणि बिकट झाले आहे. स्त्रियांच्या दैनंदिन जीवनावर आणि स्वातंत्र्यसमतेच्या लढयावरही त्याचे अनिष्ट परिणाम होतात. सर्व देशांनी ही जीवघेणी स्पर्धा थांबवून संरक्षणाचा खर्च कमी केल्यास मानवी विकास साधण्यास मदत होईल. म्हणून जागतिक शांतता प्रस्थापिक करावी अशी तिसरी मागणी घेतली आहे. तसे पाहिले तर स्त्रियांचे अनेक प्रश्न आहेत. महागाई, बेकारी, निरक्षरता, बलात्कार अत्याचार, दारूबाजी वगैरे. परंतु किमान मागण्यांवर जोरदार आवाज उठविता यावा म्हणून यंदाच्या ८ मार्चला वरील तीन मागण्यांवरच भर देण्याचे ठरले.

पुण्यामध्ये १ मार्च ते ७ मार्च हा सप्ताह वरील मागण्यांचा प्रचार सप्ताह पाळण्याचे ठरले आहे. या मागण्यांवरील फलक तयार करून ठिकठिकाणी त्याचे प्रदर्शन करणे, मोक्याच्या ठिकाणी छोटया सभा घेणे पत्रके वाटणे वगैरे प्रचार कार्यक्रम निरनिराळया संघटनांनी एकत्रित आखला आहे. ८ मार्चच्या दिवशी मागणी मोर्चा काढून कलेक्टरला निवेदन देण्यात येणार आहे. व नंतर मोर्च्याचे रूपांतर सभेत होणार आहे. सभेमध्ये स्त्रीमुक्तीगीते व इतर गीते, वरील मागण्यांवरील लघुनाटये वगैरे कार्यक्रम आहेत. निरनिराळया गावच्या स्त्रियांनीही एकजूटीने वरील मागण्यांवर आपापल्या विचारानुसार ८ मार्चचा कार्यक्रम आखावा असे आमचे कळकळीचे आवाहन आहे. आपल्या कार्यक्रमाचा थोडक्यात अहवाल बायजाकडे जरूर पाठवा. आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आपल्या स्त्रीमुक्ती चळवळीला बायजातर्फे शुभेच्छा.

— संपादक